MHLA140000222026

**<u>दि.कि.अर्ज क्र. १०/२०२६</u>**

महादेव वि. निरंक.

**<u>नि.क्र.१ वर आदेश.</u>**

अर्जदार याने प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन कायदा कलम ०२ नुसार वारसा प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळणेसाठी दाखल केला.

२. अर्जातील कथन असे आहे की, अर्जदार हा **मयत क्र.१ गणपती सिध्दू बनकर** व **मयत क्र.२ भागीर्थीबाई गणपती बनकर** यांचा वारस आहे. **मयत क्र.१ गणपती सिध्दू बनकर** हे दिनांक २५/०३/१९९५ रोजी व **मयत क्र.२ भागीर्थीबाई गणपती बनकर** ह्या दिनांक २५/०३/१९९६ रोजी दोघे मौजे बोरफळ, ता. औसा, जि. लातूर येथे मयत झाले. **मयत क्र.१ गणपती सिध्दू बनकर** व **मयत क्र.२ भागीर्थीबाई गणपती बनकर** यांचे अर्जदार हा वारस असल्याबाबत अर्जदार याला वारस प्रमाणपत्राची (Heirship Certificate) आवश्यकता आहे. सबब, त्याने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. सदरचा अर्ज दाखल केल्यानंतर अर्जदार हा मयताची वारस आहे किंवा नाही व तिच्या व्यतिरिक्त इतर कोणी वारस आहे किंवा नाही याची पडताळणी करण्यासाठी दि.२९/०१/२०२६ रोजी **'दैनिक मनोगत'** या वर्तमानपत्रातून जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला होता. त्या अनुषंगाने संबंधितांना हरकती उपस्थित करण्याबाबत निमंत्रित केले होते. सदर वर्तमानपत्राची प्रत निशाणी क्र.०८ वर आहे. तसेच सदर जाहीरनाम्याची प्रत अन्य ठिकाणी प्रसिध्दी देवुन त्या बाबतचा अहवाल दाखल करुन घेतला. परंतू कोणीही मयताचे वारस असलेबाबत आजपावेतो हरकत उपस्थित केलेली नाही.

४. अर्जदार याने अर्जात नमुद केल्याप्रमाणे तो मयताचा वारस आहे हे दाखविण्यासाठी अर्जदार याने त्याचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.०९ दाखल केले आहे. **मयत क्र.१ गणपती सिध्दू बनकर** व **मयत क्र.२ भागीर्थीबाई गणपती बनकर** हे मयत झाले हे दाखविण्यासाठी मयताचे मृत्यू प्रमाणपत्रे नि.क्र.४/१ व नि.क्र.४/२ वर व ईतर आवश्यक ती कागदपत्र दाखल केलेली आहेत. अर्जदाराच्या पुराव्यावरुन व त्याने दाखल केलेल्या मृत्यूच्या प्रमाणपत्रांवरुन **मयत क्र.१ गणपती सिध्दू बनकर** व **मयत क्र.२ भागीर्थीबाई गणपती बनकर** हे

मयत झाल्याचे दिसून येते. अर्जदार याने त्याच्या पुराव्यामध्ये अर्जदार हा वारस असल्याचे नमूद केले आहे. तसेच, त्याच्याशिवाय मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नसल्याचे नमूद केले आहे. अर्जदार याला सदरचे वारसा प्रमाणपत्र हे शासकिय व निमशासकीय योजनेचा लाभ घेण्याकरीता आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

५. अर्जदार हा **मयत क्र.१ गणपती सिध्दू बनकर** व **मयत क्र.२ भागीर्थीबाई गणपती बनकर** यांचा वारस असल्याबाबत किंवा इतर कोणी वारस असल्याबाबत जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासून आजपर्यंत कोणीही आक्षेप घेतलेला नाही. तसेच, बेलिफ अहवाल निशाणी क्र.११ वर दाखल केले आहे. यावरुन अर्जदार हा **मयत क्र.१ गणपती सिध्दू बनकर** व **मयत क्र.२ भागीर्थीबाई गणपती बनकर** यांची वारस असल्याचे दिसून येते. त्याअनुषंगाने, अर्जदार याला वारसा प्रमाणपत्र (Heirship Certificate) देण्यास कोणतीही कायदेशीर अडचण नाही. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येत आहेः–

## :: <u>आदेश</u> ::

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार हा **मयत क्र.१ गणपती सिध्दू बनकर** व **मयत क्र.२ भागीर्थीबाई गणपती बनकर** यांचा वारस या नात्याने वारसा प्रमाणपत्र (Heirship Certificate) देण्यात येत आहे.

३. अर्जदार याने आवश्यक कोर्ट फीची पूर्तता करुन घ्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PARAG PHADNIS AWATE
Date: 2026.04.01 17:15:03 +0530

दिनांकः– ०१/०४/२०२६. **(श्री. पी. पी. आवटे)**

ठिकाणः– औसा. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर., औसा.